# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# तरुण पिढीने खाशाबा जाधव यांची प्रेरणा घेत देशाभिमान जपावा : डॉ. पाटील

▲ **पाटण**, दि. १७ : ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव हे कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वाच्या बळावर सर्वोच्चपदी पोहचले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी हेलसिन्की ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक मिळवून देशाला गौरविले. आजच्या तरुण पिढीने त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि देशाभिमानाची जोपासना करावी, असे आवाहन डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी केले.

भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन (क्रीडादिन) म्हणून येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये क्रीडाविभाग व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य व्ही. ए. कळंत्रे होते. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. डांगे-पाटील म्हणाले, खाशाबा जाधव यांनी देशाला ऑलिम्पिक पदक देऊन मान दिला. आता आपण त्यांच्या स्मरणाचा मान राखून, त्यांच्या आदर्शांना जपून, आपल्या जीवनात तंतोतंत उतरविणे हे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज किमान एक तास शारीरिक क्रीडा प्रकारांना द्यावा. आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत हार न मानण्याची वृत्ती विकसित करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. कळंत्रे म्हणाले, खाशाबा जाधव यांचे यश भारतीय क्रीडा इतिहासातील सुवर्णपान आहे. महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाबरोबरच क्रीडा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणे गरजेचे आहे.

ग्रंथपाल प्रा. अनिल पाटील यांनी प्रास्ताविकात खाशाबा जाधव यांच्या संघर्षमय जीवन प्रवासाचा आढावा घेत त्यांच्या अविश्वसनीय साधनसंपत्तीतून मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात विद्यार्थी प्रतिनिधी आणि क्रीडा विभाग यांचा सक्रिय सहभाग होता. प्रा. एस. के. संकपाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.